
कविकुलगुरु - कालिदास - संस्कृत - विश्वविद्यालयः

वरं आ. पोथी

श्रीवामनद्वादशी. पूजासार्थकथाच

१२



॥ अथवामनद्वादशीपूजासार्थकथाच ॥



श्रीगणेशायनमः ॥ ॥ कर्ताप्रातर्नद्यादौगत्वा करिष्यमाणवामनजयंतीव्रतांग
त्वेन संगमस्नानंकरिष्ये (आयुर्बलंयशोवर्चःप्रजाःपशुवसूनिच ॥ ब्रह्मप्रज्ञांचमे
धांचतन्नोधेहिवनस्पते ॥ इतिवनस्पतिंप्रार्थ्य ॥ अपामार्गकाष्ठैः ॥ मुखदौर्गंध्य
नाशायदंतानांचविशुद्धये ॥ ष्ठीवनायचगात्राणांकुर्वेहंदंतधावनं॥ इतियथाचारं
दंतधावनंकृत्वा ॥) संगमस्तीर्थराजोसिसंगमःसरितांपतिः ॥ स्नानार्थंत्वांप्रपन्नो
स्मिप्रसादंकुरुसंगम॥ इतिसंगमप्रार्थनं॥ यावैश्रवणसंयुक्ताद्वादशीपरमातिथिः॥
तस्यांतुसंगमेस्नास्येसर्वपापविमुक्तये ॥ वरोवरेण्योवरदोवराहोधरणीधरः ॥ अप
वित्रंपवित्रंमांकरोतुभगवान्हरिः ॥ इतिस्नात्वा ॥ करकंपूरयिष्यामिसरितांसंग
मेजलैः ॥ पंचरत्नसमायुक्तंतेनतुष्यतुवामनः ॥ करकपूरणं ॥ पर्जन्योवरुणःसूर्यः
ससिलंकेशवःशिवः॥ त्वष्टायमोवैश्रवणःपापंहरतुमेसदा ॥ शिक्येस्थापनं ॥ अन्नं
प्रजापतिर्विष्णुरुद्रेंद्रशशिभास्कराः ॥अग्निर्वायुर्यमस्त्वष्टापापंहरतुमेसदा ॥ दधि

भक्तस्थापनं ॥ संभारानादायमध्याह्नात्परंपूजनं ॥ आचम्यदेशकालौस्मृत्वा मम
श्रीवामनप्रीतिद्वारासकलपापक्षयपूर्वकं रूपसौभाग्यमहैश्वर्यसुखसमृद्धिपितृऋण
विमुक्त्युभयकुलोद्धरणविष्णुसालोक्यादिकल्पोक्तफलसिद्ध्येवामनजयंतीव्रतंक
रिष्ये ॥ तदंगत्वेनषोडशोपचारैःपूजनंकरिष्ये ॥ गणेशपूजादिसंभारप्रोक्षणांते
पीठादौमहीद्यौरित्यादिविधिनाकुंभंसंस्थाप्य (अथवापुराणोक्तपद्धत्युक्तप्रकारेण
कलशस्थापनंयथा ॥ चतुर्भुजेशुक्लवर्णेदिव्याभरणभूषिते ॥ चतुर्दिङ्नागपृष्ठस्थेभूमे
त्वासंस्पृशाम्यहं ॥ इतिभूमिंस्पृष्ट्वा ॥ सर्वदेवमयंधान्यंसर्वोत्पत्तिकरंमहत् ॥ प्राणि
नांजीवनोपायंस्थापयामीष्टसिद्धये ॥ इतिधान्यराशिंकृत्वा ॥ तत्र ॥ देवासुरैर्मं
थ्यमानादुत्पन्नोऽसिमहोदधेः ॥ कुंभत्वयिसुराःसर्वेतीर्थानिजलदानदाः ॥ तिष्ठं
तिकामफलदारुद्रादित्यादयोऽपिच॥अतोऽत्रधान्यराशौत्वांपूजार्थंस्थापयाम्यहं ॥
इतिकलशंसंस्थाप्य ॥ गंगेचयमुनेचैवगोदावरिसरस्वति ॥ नर्मदेसिंधुकावेरिकुं

भेऽस्मिन्संनिधिंकुरु॥ इतिशुद्धजलेनापूर्य ॥ कस्तूरीकुंकुमोपेतंकर्पूरेणचसंयुतम्॥
चंदनंसर्वगंधाढ्यंकुंभेऽस्मिन्प्रक्षिपाम्यहं ॥ इतिगंधंप्र० ॥ कुष्ठमांसीहरिद्राद्याःसर्वौ
षध्योऽमृतप्रभाः ॥ सर्वामयहराश्चातःकुंभेऽस्मिन्प्रक्षिपाम्यहम् ॥ इत्यौषधीः ॥
धान्यराजांश्चमांगल्येद्विजप्रीतिकरान्यवान् ॥ यज्ञार्थंनिर्मितानस्मिन्कलशेप्रक्षि
पाम्यहं ॥ इतियवान् ॥ त्वंदूर्वेऽमृतजन्मासिवंदितासिसुरासुरैः ॥ सौभाग्यंसततं
देहिसर्वकार्यकरीभव ॥इतिदूर्वाः ॥ अश्वत्थोदुंबरप्लक्षचूतन्यग्रोधपल्लवान् ॥ अस्मि
न्कुंभेप्रक्षिपामिसर्वकर्मसुशोभनान् ॥ इतिपंचपल्लवांस्तत्त्वचश्चनिक्षिप्य ॥ गजा
श्वरथ्यावल्मीकसंगमह्रदगोकुलात्॥ मृदमानीयकुंभेऽस्मिन्प्रक्षिपामिचचत्वरात्॥
इत्यष्टमृदः ॥ फलंमनोहरंस्वादुमुनिदेवप्रियंसदा ॥ अस्मिन्कुंभेप्रक्षिपामिसर्वदा
मंगलप्रदं ॥ इतिफलं० ॥ सुवर्णरजतंमुक्ताराजावर्तप्रवालकं ॥ इमानिपंचरत्नानि
कलशेप्रक्षिपाम्यहं ॥ हिरण्यगर्भगर्भस्थंहेमबीजंविभावसोः ॥ अनंतपुण्यफलद

मतःशांतिंप्रयच्छमे ॥ इतिहिरण्यं० ॥ ईषद्धौतेनशुभ्रेणसदशेनाहतेनच ॥ संवे
ष्टयामिकलशंनूतनेनसुवाससा ॥ इतिवाससासंवेष्ट्य ॥ पूर्णपात्रंताम्रमयंशालितं
डुलपूरितं ॥ प्रधानदेवपूजार्थंन्यसामिकलशोपरि ॥) इतितदुपरिस्वर्णरजतदारु
वंशान्यतमनिर्मितेआढकमितैस्तिलैर्यवैर्गोधूमैर्वापूरितेऽहतवस्त्रकृष्णाजिनवेष्टिते
पूर्णपात्रेहैमप्रतिमायांवामनंशक्तितः पार्श्वस्थितदंडकमंडलुच्छत्रपादुकाक्षमाला
द्युपस्करयुतंपूजयेत्॥शांताकारंभुज० ॥ अजिनदंडकमंडलुमेखलारुचिरपावनवा
मनमूर्तये ॥ मितजगत्त्रितयायजितारयेनिगमवाक्पटवेबटवेनमः ॥ ध्यानं ॥ ब्रह्मां
डमुदरेयस्यमहद्भूतैरधिष्ठितः ॥ मायावीवामनःश्रीशःसोत्रायातुजगत्पतिः ॥ आ
वाहनं ॥ सुवर्णमणिसंयुक्तंमयाभक्त्याप्रकल्पितं ॥ सिंहासनमिदंदिव्यंगृह्यतांवा
मनप्रभो ॥ आसनं ॥ गंगोदकंसमानीतंसुवर्णकलशेस्थितं ॥ वासितंपुष्पगंधै
श्चपाद्यंमेप्रतिगृह्यतां ॥ पाद्यं ॥ गंधपुष्पफलैर्युक्तंहेमपात्रेनिवेशितं ॥ स्वर्गंगास

लिलंपुण्यमर्घ्यंस्वीकुरुकेशव ॥ अर्घ्यं ॥ कर्पूरवासितंतोयंमंदाकिन्याःसमाहृतं ॥
आचम्यतांजगन्नाथमयादत्तंहिभक्तितः ॥ आचमनं ॥ गंगासरस्वतीरेवापयोष्णी
यमुनाजलैः ॥ स्नापितोसिमयादेवतथाशांतिंकुरुष्वमे ॥ स्नानं ॥ पंचामृतंमया
नीतंपयोदधिघृतंमधु ॥ शर्करांपरयाभक्त्यास्नानार्थंप्रतिगृह्यतां ॥ पंचामृतं ॥ चारु
गंधोदकंशीतंकर्पूरागुरुचंदनैः ॥ एलोशीरादिसंमिश्रंस्नानीयंगृह्यतांहरे ॥ गंधो
दकं ॥ गंधादिपूर्वपूजांतेमहाभिषेकः ॥ नमःकमलकिंजल्कपीतनिर्मलवाससे ॥
महाहवरिपुस्कंधघृष्टचक्रायचक्रिणे ॥ वस्त्रं ॥ दामोदरनमस्तेस्तुत्राहिमांभवसा
गरात् ॥ उपवीतंसोत्तरीयंगृहाणपुरुषोत्तम ॥ उपवीतं ॥ मलयाचलसंभूतं० चंदनं ॥
अक्षतान् ॥ परिमलद्रव्यं ॥ माल्यादीनि० पुष्पाणि ॥ अथांगपूजा ॥ वामनाय
नमःपादौपू० ॥ दामोदराय० जंघे० ॥ श्रीपतये० ऊरू० ॥ कामदेवाय० ॥ गुह्यं० ॥ ज
गत्पतये० नाभिं० ॥ विश्वधारिणे० उदरं० ॥ योगिनाथाय० हृदयं० ॥ श्रीधराय०

कंठं० ॥ पंकजास्याय० मुखं० ॥ सर्वात्मने० शिरः० ॥ वनस्पतिरसोद्भूतोगंधा
ढ्योगंधउत्तमः ॥ आघ्रेयःसर्वदेवानांधूपोयंप्रतिगृह्यतां ॥ धूपं ॥ त्वमेवपृथिवी
ज्योतिर्वायुराकाशमच्युत ॥ त्वमेवज्योतिषांज्योतिर्दीपोयंप्रतिगृह्यतां ॥ दीपं ॥
अन्नंचतुर्विधंस्वादुरसैःषड्भिःसमन्वितं ॥ भक्त्यानिवेदितंतुभ्यंगृहाणबटुवामन ॥
नैवेद्यं ॥ इदंफलं० फलं ॥ पूगीफलं० तांबूलं ॥ हिरण्यगर्भ० दक्षिणां ॥ नीराजनं
सुमंगल्यंकर्पूरोद्भासितंविभो ॥ चंद्रार्कवह्निसदृशंवामनप्रतिगृह्यतां ॥ नीराजनं ॥
यानिकानि० प्रदक्षिणां ॥ नमोवामनरूपायनमस्तेस्तुत्रिविक्रम ॥ नमस्तेबलिबं
धायवासुदेवनमोस्तुते ॥ नमस्कारं ॥ मत्स्यंकूर्मंवराहंचनरसिंहंचवामनं ॥ रामं
रामंचकृष्णंचअर्चयामिनमोनमः ॥ पुष्पांजलिं ॥ नमस्तेपद्मनाभायनमस्तेजल
शायिने ॥ तुभ्यमर्घ्यंप्रयच्छामिबालवामनरूपिणे ॥ विशेषार्घ्यं ॥ जगदादिर्जग
द्रूपोह्यनादिर्जगदंतकृत् ॥ जलाशयोजगद्योनिःप्रीयतांमेजनार्दनः ॥ नमोनम

स्तेगोविंदभुवनेशत्रिविक्रम ॥ अघौघसंक्षयंकृत्वासर्वकामप्रदोभव ॥ मंत्रहीनं०
प्रार्थनं ॥ एवंसंपूज्यगीतादिमंगलैरात्रौजागरित्वा प्रातर्नित्यकर्मांतेदेवंसंपूज्यवि
सृज्य शिक्यस्थजलकलशयुतंसोपस्करंतंविप्रायदद्यात् ॥ दानमंत्रः ॥ वामनंस
र्वतोभद्रंद्विजायप्रतिपादये ॥ प्रीयतांतेनदेवेशोममनित्यंजनार्दनः ॥ग्रहणमंत्रः ॥
वामनोबुद्धिदोदाताद्रव्यस्थोवामनःस्वयं ॥ वामनोस्यप्रतिग्राहीवामनायनमोन
मः ॥ ततस्त्रीन्विप्रान्पृषदाज्यदध्योदनयुतान्नेनसंभोज्यकर्मसमाप्यस्वयंभुंजीत॥
शक्तौतु वाचकायप्रतिमावस्त्रादिदत्वावामनप्रीत्यर्थंब्रह्मचारिणंसंभोज्यतस्मैदंड
च्छत्रोपानहशिक्यादिदद्यात् ॥ मंत्रस्तु ॥ दध्योदनयुतंशिक्यंवारिधानीयुतंवि
भो ॥ छत्रोपानहसंयुक्तंब्राह्मणायददाम्यहं ॥ एवंद्वादशवर्षंकृत्वोद्यापनंकुर्यात् ॥

श्रीगणेशायनमः ॥ ॥ वामनद्वादशीसार्थकथाप्रारंभः ॥ धर्मराज प्रश्न करितात कीं—हे महादेवा कृष्णा, जे अनेक उपवास करण्याविषयीं अशक्त आहेत, त्यांस महाफल देणारें असें उपोषणव्रत कोणतें तें मला कथन करावें ॥ १ ॥ ते समयीं श्रीकृष्ण ह्मणतात, हे धर्मज्ञा

श्रीगणेशायनमः ॥ ॥ युधिष्ठिरउवाच ॥ ॥ उपवासासमर्थानांकिंस्यादेकमुपोषणम् ॥ महाफलंमहादेवतन्ममाचक्ष्वपृच्छतः ॥ १ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ ॥ याराजञ्छ्रवणोपेताद्वादशीमहतीतुसा ॥ तस्यामुपोषितः स्नातःपूजयित्वाजनार्दनम् ॥ प्राप्नोत्ययत्नाद्धर्मज्ञद्वादशद्वादशीफलम् ॥ २ ॥ दध्योदनयुतंतस्यांजलपूर्णंतथाघटम् ॥ वस्त्रसंवेष्टितंदत्वाछत्रोपानहमेवच ॥ ३ ॥ ॥ ॥ ॥

राजा, जी द्वादशी श्रवणनक्षत्रानें युक्त असते ती मोठी होय. कारण त्यादिवशीं स्नान करून उपोषित राहून वामनाची पूजा केली असतां बारा द्वादशीस उपोषण केल्याचें फळ प्रयत्नावांचून प्राप्त होतें ॥ २ ॥ त्या द्वादशीच्या दिवशीं दहींभातयुक्त, उदकानें भरलेला

घट वस्त्रानें वेष्टित करून त्याचें दान केलें असतां, आणि छत्री व जोडा हे पदार्थ दिले असतां दुर्गति प्राप्त होत नाहीं व मनुष्य उत्तम गतीला पावतो, आणि अंतीं अक्षय पदास जातो यांत संशय नाहीं ॥ ३ ॥ ४ ॥ श्रवणद्वादशीचा योग असतां त्या दिवशीं जर बुधवार येईल तर ती द्वादशी अत्यंत महती (फार मोठी) या नांवानें प्रसिद्ध आहे ॥ ५ ॥

नदुर्गतिमवाप्नोतिगतिमग्र्यांचविंदति ॥ अक्षय्यंस्थानमाप्नोतिनात्रकार्या विचारणा ॥ ४ ॥ श्रवणद्वादशीयोगेबुधवारोभवेद्यदि ॥ अत्यंतमहती नामद्वादशीसाप्रकीर्तिता ॥ ५ ॥ स्नानंजाप्यंतथादानंहोमःश्राद्धंसुरार्चनम् ॥ सर्वमक्षय्यमाप्नोतितस्यांकुरुकुलोद्वह ॥ ६ ॥ तस्मिन्दिनेतथास्नातोयत्रक्वचनसंगमे ॥ सगंगास्नानजंराजन्फलंप्राप्नोत्यसंशयम् ॥ ७ ॥

हे कुरुकुलश्रेष्ठा, त्या दिवशीं स्नान, जप, दान, होम, श्राद्ध आणि देवतार्चन केलें असतां तें सर्व अक्षयफलदायक होतें ॥ ६ ॥ तसेंच हे राजा, त्या दिवशीं कोणत्याही संगमीं जो कोणी स्नान करितो तो निश्चयेंकरून भागीरथीस्नानाचें फल पावतो ॥ ७ ॥

सर्व संगम केवल श्रवणनक्षत्रीं निरंतर उत्तम संतोषदायक आहेत. आणि द्वादशीयुक्त श्रवणनक्षत्रीं तर ते विशेष फलदायक आहेत व बुधवारयुक्त असेल तर त्यापेक्षांही विशेष फल देणारे आहेत ॥ ८ ॥ तशीच द्वादशी बुधवार आणि श्रवण यांनीं युक्त असेल तर

श्रवणेसंगमाःसर्वेपरतुष्टिप्रदाःसदा ॥ विशेषाद्वादशीयुक्ताबुधयुक्ताविशेषतः ॥ ८ ॥ तथैवद्वादशीप्रोक्ताबुधश्रवणसंयुता ॥* शुद्धाश्रवणसंयुक्ता संगमेविजयास्मृता ॥ ९ ॥ वारिकुंभंप्रदायास्यांदध्योदनसमायुतम् ॥ प्रेतयोनौनजायेतपूजयित्वात्रवामनम् ॥ १० ॥ वंशःसमुद्धृतस्तेनमुक्तः पितृऋणादसौ ॥ नभस्येसंगमेस्नात्वावामनोयेनपूजितः ॥ सयातिपरमं स्थानंविष्णुसायुज्यमाप्नुयात् ॥ ११ ॥ ॥ ॥

तिला शुद्ध द्वादशी असें ह्मणतात. केवल श्रवणानें युक्त असेल तर ती विजयानामेंकरून प्रसिद्ध आहे ॥ ९ ॥ त्यादिवशीं दध्योदनयुक्त उदकुंभदान केलें असतां व वामनाची पूजा केली असतां प्रेतयोनीला जात नाहीं ॥ १० ॥ वामनपूजा व दध्योदन हीं कृत्यें

* नभस्ये फाल्गुने मासि यदि वा द्वादशी भवेत् इति पाठांतरम् ॥

ज्यानें केलीं त्यानें वंशाचा उद्धार केला व तो पितृऋणांतून मुक्त होतो. भाद्रपदांत संगमीं स्नान करून जो वामनाची पूजा करील तो उत्तम लोकास जाऊन विष्णूचें सायुज्य पावेल ॥ ११ ॥ श्रीकृष्ण ह्मणतात—हे राजश्रेष्ठा युधिष्ठिरा, या व्रताचें विधान मुनींनीं जसें सांगितलें आहे तसें तुला सांगतों श्रवण कर. एकादशीच्या दिवशीं उपोषण करून व्रतसंबं-

श्रीकृष्णउवाच ॥ विधानंशृणुराजेंद्रयथादृष्टंमनीषिभिः ॥ यथोक्तंनियमं कुर्यादेकादश्यामुपोषितः ॥ १२ ॥ दंतान्संशोध्ययत्नेनवाग्यतोनियतें द्रियः ॥ श्रवणद्वादशीयोगेसमुपोष्यजनार्दनम् ॥ १३ ॥ अर्चयित्वावि धानेनत्रयोदश्यांपरेहनि ॥ नदीनांसंगमेस्नायादर्चयेदत्रवामनम् ॥१४॥

त्वहंमोक्ष्ये

धानें जसे नियम सांगितले आहेत तसे ॥ १२ ॥ दंतधावन करून यत्नानें मौन धारणपूर्वक जितेंद्रिय राहून श्रवणनक्षत्रयुक्त द्वादशीला उत्तम रीतीनें उपवास करून विधियुक्त विष्णूची पूजा करावी. नंतर दुसरे दिवशीं त्रयोदशीला नद्यांचे संगमीं स्नान करावें व तेथेंच वामनाची पूजा करावी ॥ १३ ॥ १४ ॥ ॥ ॥ ॥

वामनप्रतिमा सुवर्णाची बारा अंगुळें उंच व वस्त्रयुक्त असावी. उत्तम पीत वस्त्रांनीं मृत्तिकेचा नवीन अच्छिद्र कलश वेष्टन करावा ॥ १५ ॥ सुवर्णाचें अर्घ्यपात्र करावें. त्यांत दहीं, अक्षता, फलें, सुवर्ण व गंध हे पदार्थ घालून तें अर्घ्यपात्र पुढील मंत्रानें वामनास द्यावें ॥ १६ ॥ मंत्र—हे पद्मनाभा, तुला नमस्कार. हे जलशायिन्, तुला नमस्कार. हे बाल-

सौवर्णं वस्त्रसंयुक्तं द्वादशांगुलमुच्छ्रितम्।

सौवर्णींवस्त्रसंयुक्तांद्वादशांगुलमुच्छ्रिताम् ॥ पीतवस्त्रैःशुभैर्वेष्टचमृत्पात्रम
व्रणंनवं ॥१५॥ हिरण्मयेनपात्रेणअर्घ्यपात्रंप्रकल्पयेत् ॥ दध्यक्षतफलैश्चै
वसहिरण्यंसचंदनम् ॥ १६ ॥ नमस्तेपद्मनाभायनमस्तेजलशायिने ॥
तुभ्यमर्घ्यंप्रयच्छामिबालवामनरूपिणे ॥१७॥ नमःशार्ङ्गसीरबाणपाणये
वामनायच ॥ यज्ञभुक्फलदात्रेचवामनायनमोनमः ॥ १८ ॥ ॥

वामनरूपा, तुजकारणें मी अर्घ्य देतों ॥ १७ ॥ शार्ङ्ग धनुष्य, नांगर आणि बाण हीं आयुधें धारण करणाऱ्या वामनास नमस्कार; यज्ञभोक्ता व यज्ञफल देणारा अशा वामनाला पुनः पुनः नमस्कार असो ॥ १८ ॥ ॥ ॥ ॥

तसाच देवांचाही ईश्वर, देवांचा उत्पादक, अशा सर्व देवांचा प्रभु जो वामन त्यास वारंवार नमस्कार असो ॥ १९ ॥ मत्स्य, कूर्म, वराह, नारसिंह, भार्गवराम व दाशरथी राम असे अनेक ज्याचे अवतार त्या वामनाला वारंवार नमस्कार असो ॥ २० ॥ हे श्रीधरा, तुला

देवेश्वरायदेवायदेवसंभूतिकारिणे ॥ प्रभवेसर्वदेवानांवामनायनमोनमः
॥ १९ ॥ मत्स्यकूर्मवराहेभ्योनारसिंहस्वरूपिणे ॥ रामचंद्रायरामायवामनायनमोनमः ॥ २० ॥ श्रीधरायनमस्तेस्तुनमस्तेगरुडध्वज ॥ चतुर्बाहोनमस्तेस्तुनमस्तेधरणीधर ॥ २१ ॥ एवंसंस्तूयविधिवन्नरःप्रस्कंदनामभिः ॥ रात्रौजागरणंकुर्यात्पुरतोजलशायिनः ॥ २२ ॥ ॥

नमस्कार असो. हे गरुडध्वजा, तुला नमस्कार असो. हे चतुर्भुजा, तुला नमस्कार असो. हे धरणीधरा, तुला नमस्कार असो ॥ २१ ॥ याप्रमाणें दैत्यनाशना, कंसमर्दना इत्यादि कर्मनामांनीं उत्तम स्तवन करून जलशायी वामनाच्या अग्रभागीं रात्रौ जागरण करावें ॥२२॥

जो बालरूप धारण करून क्षीरसमुद्रांत क्रीडा करिता झाला, व आकाशादिपंचमहाभूतांनीं युक्त ब्रह्मांड ज्याच्या उदरांत आहे ॥ २३ ॥ असा मायावी वामन जगत्पालक लक्ष्मीकांत तो येथें येवो. अशी उत्तम स्तुति करून द्वादशीचे दिवशीं सूर्योदयाचे समयीं ॥ २४ ॥

धृत्वाबालमयंरूपंदेवोऽक्रीडत्पयोनिधौ ॥ ब्रह्मांडमुदरेयस्यमहद्भूतैरधिष्ठितम् ॥ २३ ॥ मायावीवामनःश्रीशःसोऽत्रायातुजगत्पतिः ॥ एवंसंस्तूय तंभक्त्याद्वादश्यामुदयेरवेः ॥ २४ ॥ शृंगारसहितंतंचब्राह्मणायनिवेदयेत् ॥ वामनःप्रतिगृह्णातिवामनोहंददामिते ॥ वामनंसर्वतोभद्रंद्विजाय प्रतिपादये ॥ २५ ॥ जलधेनुंतथादद्याच्छत्रंचैवतुपादुके ॥ सहिरण्यानि वस्त्राणिवृषंधेनुंतथानृप ॥ २६ ॥ ॥ ॥

ती शृंगारसहित वामनाची प्रतिमा ब्राह्मणाला द्यावी. दानमंत्र–वामन ग्रहण करितो, मी वामन तुला देतों, सर्व मंगलरूप जो वामन त्यास ब्राह्मणाला देतों ॥ २५ ॥ तशीच धेनु, छत्री, खडावा, सुवर्णसहित वस्त्रें, हे राजा, तसाच वृषभ व गाय हीं दानें द्यावीं ॥ २६ ॥

श्रवण नक्षत्रयुक्त द्वादशीला गरुडध्वजाची पूजा करून त्यादिवशीं जें किंचित्‌ही दान करावें तें वामनास प्राप्त होतें. ब्राह्मणांस दानें देऊन द्वादशी व श्रवण यांचा वियोग झाल्यानंतर पारणा करावी ॥ २७ ॥ श्रीकृष्ण ह्मणतात, याविषयीं एक प्राचीन इतिहास

यत्किंचिद्दीयतेतत्रतद्दानंप्राप्यतेध्रुवम् ॥ श्रवणद्वादशीयोगेसंपूज्यगरुडध्वजम् ॥ दत्वादानंद्विजातिभ्योवियोगेपारणंततः ॥ २७ ॥ श्रीकृष्ण उवाच ॥ ॥ अत्राप्युदाहरामीममितिहासंपुरातनम् ॥ महत्यरण्येयद्वृत्तं भूमिपालशृणुष्वतत् ॥ २८ ॥ देशोदशार्णकोनामतस्यभागेतुपश्चिमे ॥ अस्तिराजन्मरुद्देशःसर्वसत्त्वभयंकरः ॥ २९ ॥ सुतप्तवालुकाभूमिर्यत्रदुष्टामहोरगाः ॥ अल्पच्छायाद्रुमास्तत्रमृतप्राणिसमाकुलाः ॥ ३० ॥ ॥

सांगतों. हे राजा, मोठ्या अरण्यांत जें वर्तमान घडलें तें ऐक ॥ २८ ॥ दशार्ण देशाच्या पश्चिमभागीं सर्व प्राणिमात्रांला भयंकर असा मरुत् (मारवाड) ह्मणून एक देश आहे ॥ २९ ॥ त्या देशांत अत्यंत तापलेल्या वाळूनें युक्त भूमि असून तेथें मोठे दुष्ट सर्प आहेत.

त्या देशांतील वृक्ष अल्पच्छायायुक्त असून मृत प्राण्यांनींयुक्त आहेत ॥ ३० ॥ शमी, खैर, पळस, कारवी व पीलु असे वृक्ष असून ते वानरांनीं वेष्टित आहेत ॥ ३१ ॥ तशीच तेथील भूमि कोठें कोठें दग्ध झालेल्या प्राणिसमुदायांनीं व्याप्त आहे. सूर्याच्या तीक्ष्ण किरणांनीं

शमीखदिरपालाशकरीरैश्चसपीलुभिः ॥ यत्रभीमगणावृक्षामर्कटैःपरिवेष्टिताः ॥ ३१ ॥ दग्धप्राणिगणाकीर्णायत्रभूर्दृश्यतेक्वचित् ॥ अर्कप्रतापैः संतप्तापरुषानिस्तृणामही ॥३२॥ ज्वलिताग्निसमंचैवयत्किंचित्तत्रदृश्यते ॥ तथापिलोकाजीवंतिसर्वेकर्मनिबंधनात् ॥ ३३ ॥ नोदकंनोतृषाहारा राजंस्तत्रबलाहकाः ॥ कदाचिदपिदृश्यंतेप्लवमानाविहंगमाः ॥ ३४ ॥ ॥

अत्यंत तप्त झालेली तृणरहित रुक्ष भूमी आहे ॥ ३२ ॥ त्याचप्रमाणें तेथें स्थलविशेषीं प्रज्वलित अग्नीसारखें यत्किंचित् दिसत आहे. तथापि तेथील सर्व लोक प्रारब्धकर्मबलानें वांचतात ॥ ३३ ॥ हे राजा, तेथें पाणी नसून तृषा हरण करणारे मेघही नाहींत. तेथें एखादेवेळींच पक्षी उडतांना दिसतात ॥ ३४ ॥

ते पक्षी अरण्यांत जाऊन कित्येक पिलांसह तृषायुक्त होऊन वाळूच्या प्रदेशांतच मरण पावतात. यास दृष्टांत–जसे वाळूचे पूल उदकानें नाश पावतात त्याप्रमाणें ते मरण पावतात ॥ ३५ ॥ तशा प्रकारच्या त्या प्रदेशांत वैश्यवृत्तीनें उपजीविका करणारा एक हरिदत्त

तेकांतारगतैःकैश्चित्तृषितैःशिशुभिःसमम् ॥ सैकतेष्वेवनश्यंतिजलैःसैक
तसेतुवत् ॥ ३५ ॥ तस्मिंस्तथाविधेदेशेकश्चिद्दैववशाद्वणिक् ॥ हरिदत्त
इतिख्यातोवणिग्धर्मोपजीवकः ॥ ३६ ॥ निजसार्थपरिभ्रष्टःप्रविष्टोमरुजां
गले ॥ दृष्टवान्मलिनान्रूक्षान्निर्मांसान्भीमदर्शनान् ॥३७॥ बभ्रामभ्रांत
हृदयःक्षुत्तृषाश्रमकर्षितः ॥ क्वग्रामःक्वजनःक्वाहंक्वयास्यामिकिमाचरे ॥३८॥

नावाचा प्रख्यात वाणी ॥३६॥ आपल्या सोबत्यांपासून चुकून त्या मरुजांगल देशांत आला. तेथें मलिन, रूक्ष, मांसरहित आणि दिसण्यांत अति भयंकर अशा लोकांस त्या वाण्यानें पाहिलें ॥ ३७ ॥ त्यामुळें श्रांतचित्त होत्साता क्षुधा, तृषा व श्रम यांनीं व्याकुल होऊन इकडे तिकडे फिरूं लागला. फिरतां फिरतां मनांत विचार करूं लागला कीं, माझा गांव

कोठें आहे, माझे स्वजन कोणीकडे गेले, मी आतां कोठें आहें, कोठें जाऊं व काय करूं ॥३८॥ असा मनांत विचार करतो आहे तों त्यानें कांहीं पिशाचें पाहिलीं. त्यांचीं सर्व इंद्रियें क्षुधा आणि तृषा यांनीं व्याकुळ झालीं असून तीं क्षुधेनें कृश झालीं आहेत. त्यांचे वृषण लंबमान

अथप्रेतान्ददर्शासौक्षुत्तृषाव्याकुलेंद्रियान् ॥ क्षुत्क्षामान्लंबवृषणान्निर्मां
सांश्वसकीकसान् ॥ ३९ ॥ स्नायुबद्धास्थिचरणान्धावमानानितस्ततः ॥
वणिक्सोपितदाश्चर्यंदृष्ट्वाभयमुपागतः ॥ ४० ॥ भीतभीतस्तुतैःसार्धंज
गामपथिवंचयन् ॥ ततोगत्वापिशाचास्तेन्यग्रोधंमहदाश्रयम् ॥ ४१ ॥

आणि देह मांसरहित असल्यामुळें तीं केवळ अस्थिपंजराप्रमाणें दिसत आहेत ॥ ३९ ॥ त्यांच्या शरीराचीं हाडें व पाय हे स्नायूंनीं बांधले असून तीं इकडेतिकडे धांवत होतीं. असें तें आश्चर्य पाहून तो वाणी भयभीत झाला ॥ ४० ॥ तथापि तो त्यांची निराशा न करितां त्यांच्या बरोबर मार्ग चालत होता. नंतर तीं पिशाचें त्या मार्गानें जाऊन शीतळ

छायायुक्त आणि फारच विस्तीर्ण अशा एका मोठ्या वडाच्या वृक्षाखालीं बसलीं. याप्रमाणें तीं सर्व पिशाचें त्या झाडाखालीं बसल्यानंतर तो वाणीही त्याच झाडाखालीं दुसरीकडे जाऊन बसला ॥ ४१ ॥ ४२ ॥ नंतर एका पिशाचाच्या खांद्यावर बसलेलें असून सभोंवतीं

शीतच्छायंसुविस्तीर्णंतत्रतेसमुपाविशन् ॥ निविष्टेषुततस्तेषुएकदेशेस्थि
तोवणिक् ॥ ४२ ॥ प्रेतस्कंधसमारूढमेकंविकृतदर्शनम् ॥ ददर्शबहुभिः
प्रेतैःसमंतात्परिवारितम् ॥ ४३ ॥ आगच्छन्शवभक्षीसस्तुतिशब्दपुरः
सरम् ॥ प्रेतस्कंधान्महींगत्वातस्यांतिकमुपागतः ॥ ४४॥ सोपिवाचाव
णिक्श्रेष्ठमिदंवचनमब्रवीत् ॥ अस्मिन्घोरतरेदेशेप्रवेशोभवतःकथम् ॥४५॥

पुष्कळ पिशाचांनीं वेष्टित असें एक भयंकर पिशाच त्या वाण्यानें पाहिलें ॥ ४३ ॥ तेव्हां तेंच प्रेतभक्षक मुख्य पिशाच, इतर पिशाचें त्याची स्तुति करीत असतां तेथें आलें आणि पिशाचाच्या खांद्यावरून जमिनीवर उतरून जेथें तो वाणी बसला होता तेथें आलें ॥४४॥ आणि त्यास विचारिलें कीं हे वैश्या, या भयंकर देशांत तुझा प्रवेश कसा झाला ? ॥४५॥

तेव्हा तो बुद्धिवान् वैश्य त्यास ह्मणाला, मीं आपल्या बरोबरच्या सोबत्यांपासून चुकून पराधीन झाल्यामुळें दुष्कर्मप्रेरित दैवयोगानें एथें आलों ॥ ४६ ॥ तृषा मला अतिशय पीडा देत आहे. केवळ तृषाच पीडा देत आहे असें नाहीं तर क्षुधा व तृषा दोन्ही अत्यंत

तमुवाचवणिग्धीमान्सार्थभ्रष्टस्तदाऽवशः ॥ प्रवेशोदैवयोगेनकष्टकर्मकृते
नतु ॥ ४६ ॥ तृष्णामांबाधतेत्यर्थंक्षुत्तृषौचभृशंतथा ॥ प्राणाःकंठमनुप्रा
प्तावचनंनश्यतीवमे ॥ ४७ ॥ अत्रोपायंनपश्यामिजीवेयंयेनकेनचित् ॥
॥ श्रीकृष्णउवाच ॥ ॥ इत्येवमुक्तःप्रेतस्तुवणिजंवाक्यमब्रवीत् ॥४८॥
पुन्नागमिममाश्रित्यप्रतीक्षस्वमुहूर्तकम् ॥ कृतातिथ्योयथापश्चाद्गमिष्य
सियथासुखम् ॥ ४९ ॥ ॥ ॥

बाधा करीत आहेत. प्राण कंठाशीं आले आहेत. बोलवतही नाहीं ॥ ४७ ॥ या प्रसंगीं मी कोणत्या उपायानें वांचेन तो उपाय मला सुचत नाहीं. श्रीकृष्ण ह्मणतात, असें भाषण करणाऱ्या वैश्यास तें पिशाच बोललें ॥ ४८ ॥ तूं या पुन्नाग (उंडिणीचा वृक्ष) वृक्षा- ॥११॥

च्याखालीं बसून दोन घटका वाट पहा ह्मणजे तुझें आतिथ्य आह्मीं यथासांग करूं. नंतर तूं सुखेंकरून गमन कर ॥ ४९ ॥ असें त्याचें भाषण ऐकून तो तृषाक्रांत झालेला वैश्य त्याच्या सांगण्याप्रमाणें पुन्नाग वृक्षाखालीं वाट पहात राहिला. नंतर मध्याह्न समय प्राप्त

एवमुक्तस्तथाचक्रेसवणिक्तृषयार्दितः ॥ मध्याह्नसमयेप्राप्तेततस्तंदेशमा
गतः ॥ ५० ॥ पुन्नागवृक्षाच्छीतोदावारिधारामनोरमा ॥ दध्योदनसुयु
क्तेनवर्धमानेनसंयुता ॥ ५१ ॥ अवतीर्यततःसोग्रेददावतिथयेतदा ॥
दध्योदनंचतोयंचक्षुत्तृड्भ्यांपीडितायवै ॥ ५२ ॥ दध्योदनेनतोयेनपरां
तृप्तिमुपागतः ॥ वितृष्णोविज्वरश्चापिक्षणेनचबभूवह ॥ ५३ ॥ ॥

झाला असतां ॥ ५० ॥ त्या पुन्नाग वृक्षापासून शीतलोदकाची सुंदर जलधारा एका परळांतील उत्तम योग्य दध्योदनानेंयुक्त अशी प्रगट झाली ॥ ५१ ॥ नंतर तिच्या अग्रभागीं त्या पिशाचपतीनें उतरून त्याकाळीं दध्योदन व उदक त्या क्षुधातृषांनीं पीडित अतिथीला दिलें ॥ ५२ ॥ त्या दध्योदनानें व उदकानें तो वैश्य अत्यंत तृप्त झाला, व क्षणमात्रेंकरून

क्षुधा व तृषा यांहींरहित झाला ॥ ५३ ॥ नंतर त्या पिशाचराजानें आपल्या बरोबरच्या पिशाचसमुदायास त्या जलसहित दध्योदनांतून क्रमानें सर्वांस भाग दिला. तेणेंकरून सर्व पिशाचें उत्कृष्ट तृप्ति पावलीं ॥ ५४ ॥ याप्रमाणें अतिथि व सर्व पिशाचें यांस तृप्त

ततस्तुप्रेतसंघस्यतस्माद्भागंक्रमाद्ददौ ॥ दध्योदनात्सपानीयात्प्रेतास्तृप्तिं परांगताः ॥ ५४ ॥ अतिथिंतर्पयित्वाचप्रेतलोकंचसर्वशः ॥ ततःस्वयंच बुभुजेभुक्तशेषंयथासुखम् ॥५५॥ ततोभुक्तवतस्त्वन्नंपानीयंचक्षयंययौ ॥ प्रेताधिपंततस्तुष्टोवणिग्वचनमब्रवीत् ॥५६॥ वणिगुवाच ॥ ॥ आश्चर्य मेतत्परमंवनेस्मिन्प्रतिभातिमे ॥ अन्नपानस्यसंप्राप्तिःपरमस्यकुतस्तव ॥५७॥

करून नंतर सर्वांचा भुक्तशेष दध्योदन त्यानें स्वतः सुखेंकरून भक्षण केला ॥ ५५ ॥ अशाप्रकारें त्याचें भोजन झाल्यावर तें दध्योदन व उदक सर्व समाप्त झालें. नंतर तो संतोष पावलेला वैश्य त्या प्रेतराजाला बोलला ॥ ५६ ॥ या वनांत मोठें आश्चर्य मला भासतें तें हें कीं, तुला येथें उत्तम अन्न व उदक यांची प्राप्ति कशी होते ॥ ५७ ॥

तसेंच अल्प अन्नानें तूं अरण्यांत अत्यंत मोठ्या परिवाराचें पोषण करितोस आणि अशा अल्प अन्नानें हे पिशाचगण कसे तृप्ति पावतात ? कारण यांचीं पोटें मोठीं असून देह मांसरहित कृश असे आहेत ॥ ५८ ॥ आणि दुसरें असें कीं, हे पिशाचगण तुजविषयीं

स्तोकेनचतथान्नेनबिभर्षिसुबहून्वने ॥ तृप्तिंगताःकथंत्वेतेनिर्मांसाभीमकु
क्षयः ॥ ५८ ॥ अपरंचकथंस्नेहमवाप्तावापरिक्षयम् ॥ अत्रघोरेचकस्मा
त्वंसंप्राप्तोनिर्जलेवने ॥५९॥ तृप्तश्चासिकथंग्रासमात्रेणैवशुभंवद ॥ पिशा
चपतिरुवाच ॥ ॥ शृणुभद्रप्रवक्ष्यामिदुष्कृतंकर्मचात्मनः ॥६०॥ शाकले
नगरेरम्येअहमासंसुदुर्मतिः ॥ वणिगासंपुराकालेततोभद्रमवापह ॥६१॥

प्रेमयुक्त कसे कसे झाले व तुमचें भोजन होतांच हें अन्नोदक कसें समाप्त झालें आणि तूं या घोर निर्जल वनांत कां आलास ॥ ५९ ॥ व तूं ग्रासमात्र अन्नानें तृप्त कसा झालास ह्याचें कारण काय असेल तें मला खरोखर सांग. तें ऐकून पिशाचपति बोलतो बाबा, मी आपलें पापकर्म सांगतों ऐक ॥ ६० ॥ पूर्वीं शारल नामक रम्य नगरांत मी अत्यंत दुष्टबुद्धि व

श्रीमंत असा वैश्य होतों ॥ ६१ ॥ मी दुरात्मा व नास्तिक असा असल्यामुळें माझ्या स्त्रीनें मला दानधर्म करण्यास सांगितलें असतांही धनलोभानें मीं भिक्षुकाला भिक्षा घातली नाहीं तसेंच तृषिताला उदक सुद्धां केव्हांही पाजिलें नाहीं. तेथें एक ब्राह्मण मजसारखा व्यापारी

शाकलेनगरेरम्येनास्तिकेनदुरात्मना ॥ धनलोभात्तथातत्रकदाचित्प्रमदे
रिता ॥ ६२ ॥ नदत्ताभिक्षेवभिक्षातृषितेंबुकदाचन ॥ प्रतिवैश्यस्तुतत्रासी
द्ब्राह्मणोगुणवान्मम ॥ ६३ ॥ श्रवणद्वादशीयोगेमासिभाद्रपदेतथा ॥
सकदाचिन्मयासार्धंतापींनामनदींययौ ॥ ६४ ॥ तस्यास्तुसंगमः पुण्यो
यत्रासीच्चंद्रभागया ॥ चंद्रभागासोमसुतातापीचैवार्कनंदिनी ॥ ६५ ॥

होता. तो गुणवान् असून माझा मित्र होता ॥ ६२ ॥ ६३ ॥ एके समयीं भाद्रपदमासीं श्रवणद्वादशीचे योगावर मजसहवर्तमान तो तापीनामक नदीस गेला ॥ ६४ ॥ तेथें तिचा चंद्रभागा नदीशीं संगम मोठा पुण्यकारक झाला आहे. चंद्रभागाही चंद्रकन्या असून तापी सूर्यकन्या आहे ॥ ६५ ॥

त्यांचीं उदकें त्या रमणीय संगमीं अनुक्रमें शीतल व उष्ण आहेत. त्या तीर्थश्रेष्ठ संगमीं प्राप्त होऊन माझा मित्र प्रतिवैश्य ब्राह्मण ॥ ६६ ॥ यानें श्रवणद्वादशीचे योगावर त्या संगमतीर्थांत स्नान करून उपोषण केलें आणि चंद्रभागेच्या जलानें पूर्ण, नवा दृढ ॥ ६७ ॥

तयोःशीतोष्णसलिलेसंगमेसुमनोहरे ॥ तत्तीर्थवरमासाद्यप्रतिवैश्यःसमे
द्विजः ॥ ६६ ॥ श्रवणद्वादशीयोगेस्नातश्चैवोपवासकृत् ॥ चंद्रभागासु
तोयस्यवारिकुंभंनवंदृढम् ॥ ६७ ॥ दध्योदनयुतैःसार्धंसंपूर्णंवर्धमानकैः ॥
छत्रोपानद्युगंवस्त्रंप्रतिमांविधिवद्धरेः ॥ ६८ ॥ प्रददौविप्रमुख्यायरहस्य
ज्ञोमहामुनिः ॥ वित्तसंरक्षणार्थायतस्यापिचततोमया ॥ ६९ ॥ सोपवासे
नदत्तावैवारिधानीसुशोभना ॥ चंद्रभागास्थविप्रायदध्योदनयुतातदा ॥७०॥

असा उदकुंभ एका परळांतील पूर्ण भरलेल्या दध्योदनयुक्त पात्रांसह छत्री, जोडा, वस्त्र आणि वामनप्रतिमा यांसहवर्तमान विधीनें ॥ ६८ ॥ त्या वेदतात्पर्य जाणणाऱ्या महामुनी ब्राह्मणानें एका श्रेष्ठ ब्राह्मणास दिलें, नंतर त्या ब्राह्मणाच्या सांगण्यावरून मीही आपल्या धनसंरक्षणार्थ ॥ ६९ ॥ उत्तम सुशोभित दध्योदनयुक्त उदकाची झारी उपवास

वा. द्वा. ॥१४॥

करून चंद्रभागातीरस्थ ब्राह्मणास त्या कालीं दिली ॥७०॥ असें करून मी स्वगृहीं आलों. नंतर कांहीं कालानें मी मरण पावून नास्तिक बुद्धीमुळें पिशाच झालों. ॥ ७१ ॥ आतां या घोर अरण्यांत माझें कुशल कसें आहे तें मी तुला सांगतों. मीं आपला पुरोहित पाहिला.

एतत्कृत्वागृहंप्राप्तस्ततःकालेनकेनचित् ॥ पंचत्वमहमासाद्यनास्तिक्यात्
प्रेततांगतः ॥ ७१ ॥ अस्यामटव्यांघोरायांयथास्वंकुशलंतदा ॥(पुरोहितो
मयादृष्टःस्नात्वागृहमुपागतः ॥ ७२ ॥ शिक्यहस्तःसकलशोद्वादश्यांसमु
पोषितः ॥ तेनापिकथितातत्रश्रवणद्वादशीशुभा ॥७३॥ सविनयंसोपदे
शंव्रतंकृत्वामयानघ ॥ तस्येयंकर्मणःपुष्टिर्येयंदृष्टात्वयानघ ॥७४॥ यदन्नंच
मयादत्तंसजलंघटकांचनं ॥ तत्तन्मांभजतेनित्यंपिशाचत्वेपिनित्यशः ॥७५॥)

तो स्नान करून घरीं आला ॥ ७२ ॥ त्याच्या हातांत शिंकें व कलश असून तो त्या द्वादशीला उपोषित होता ॥ ७३ ॥ तेव्हां सविनय उपदेशसहित तें व्रत मीं केलें. त्या कर्माचें हें पुष्टिरूप फळ मला प्राप्त झालें तें त्वां अवलोकन केलें ॥ ७४ ॥ त्या व्रतसंबंधानें उदक-

कथा. ॥१४॥

* श्रवणद्वादशीयोगे दत्ताया सा मयाद्विजे॥ दध्योदनयुतातावद्धारिधानीमनोहरा

सहित जें अन्न, कलश व सुवर्ण दिलें तें तें मला निरंतर या पिशाच योनींतही नित्य प्राप्त होत आहे ॥ ७५ ॥ हे निष्पापा वैश्या, तूं जसें पाहिलेंस तसें हें श्रवणद्वादशीचें फळ प्रतिदिवशीं मध्याह्नकाळीं मला प्राप्त होतें ॥ ७६ ॥ श्रवणद्वादशीचा उपवास केला त्या पुण्याईनें मला पूर्वजन्माचें स्मरण आहे. तसेंच दध्योदन दान केलें तेणेंकरून मला अक्षय्य अन्नोदक प्राप्त होतें ॥७७॥ हे परिवार जे आहेत ते ब्राह्मणाचें द्रव्य हरण करणारे पापी पिशाच योनीला प्राप्त झाले आहेत. यांत कोणी परस्त्रीसक्त असे आहेत व कित्येक स्वामिद्रोह करणारे आहेत ॥ ७८ ॥ कितीएक मित्रद्रोहाविषयीं तत्पर अशीं पिशाचें या अति भयंकर देशांत अन्नदानाच्या पुण्यानें माझे सेवक झालीं आहेत ॥ ७९ ॥

* सेयंमध्याह्नसमयेदिवसेदिवसेमम ॥ उपतिष्ठतिवैश्येहयथादृष्टंत्वयानघ ॥ ७६ ॥ उपवासफलेनैवजातिस्मरणमेवच ॥ दधिभक्तप्रसादेनजलान्नं चाक्षयंमम ॥ ७७ ॥ ब्रह्मस्वहारिणस्त्वेतेपापाःप्रेतत्वमागताः ॥ परदाररताःकेचित्स्वामिद्रोहरताःपरे ॥ ७८ ॥ मित्रद्रोहरताःकेचिद्देशेस्मिंस्तुसुदारुणे ॥ ममैतेभृत्यतांप्राप्ताअन्नदानादिकेनच ॥ ७९ ॥ ॥

सनातन परमात्मा भगवान् विष्णु कालत्रयीं अक्षय्य आहे. त्याच्या उद्देशानें जें द्यावें तें अक्षय्य होतें ॥ ८० ॥ अशा त्या अक्षय्य दानानें हीं पिशाचें पुनःपुनः नित्य तृप्त होतात; परंतु प्रेतयोनीमुळें यांस यांचा दुर्बळपणा कधींही सोडीत नाहीं ॥ ८१ ॥ अशा या घोर अरण्यांत तूं अतिथि प्राप्त झालास आणि मीं तुझी पूजा केली ह्मणून मी या प्रेत योनीं-

अक्षय्योभगवान्विष्णुःपरमात्मासनातनः ॥ यद्दीयतेतमुद्दिश्यअक्षय्यंतत्प्रकीर्तितम् ॥ ८० ॥ तेनाक्षय्येनचान्नेनतृप्ताएतेपुनःपुनः ॥ प्रेतभावाच्चदौर्बल्यंनमुंचंतिकदाचन ॥ ८१ ॥ अहंचपूजयित्वात्वामतिथिंसमुपस्थितम् ॥ प्रेतभावाद्विनिर्मुक्तोयास्यामिपरमांगतिम् ॥८२॥ मयाविहीनाःकिंत्वेतेवनेस्मिन्भृशदारुणे ॥ पीडामनुभवंत्येवदारुणांकर्मयोनिजाम् ॥८३॥

तून मुक्त झालों. आतां मी उत्तम गतीला जाईन ॥ ८२ ॥ परंतु हीं पिशाचें मी गेल्यानंतर या अत्यंत घोर अरण्यांत स्वकर्मनिर्मित पिशाचयोनिसंबंधी उग्र यातना भोगीत राहतील ॥ ८३ ॥

ह्मणून हे महाभाग्यशाली वैश्या, मजवर अनुग्रह करण्याच्या इच्छेनें या सर्वांचीं अनेक नामगोत्रें मजपासून ग्रहण कर ॥ ८४ ॥ ही माझ्या काखेंत यांच्या नामगोत्रांची वही आहे ती घे, आणि हिमालयावर जाऊन तेथें तुला द्रव्याचा निधि मिळेल ॥ ८५ ॥ तो घेऊन तूं गयेस जा. आणि हे महाबुद्धिमंता, एका एका पिशाचाच्या उद्देशेंकरून प्रतिपिशाचाचें

एतेषांतुमहाभागममानुग्रहकाम्यया ॥ अनेकनामगोत्राणिगृह्णीष्वत्वखि लंमम ॥ ८४ ॥ अस्तिकक्षागताचैवतत्त्वसंपुटिकाशुभा ॥ हिमवंतमथा साद्यतत्रत्वंलप्स्यसेनिधिम् ॥ ८५ ॥ गयाशीर्षंततोगत्वाश्राद्धंकुरुमहाम ते ॥ एकमेकमथोद्दिश्यप्रेतेप्रेतेयथासुखम् ॥ ८६ ॥ एवंसंभाषमाणस्तंत प्तजांबूनदप्रभः ॥ समारुह्यविमानंसस्वर्गलोकमितोगतः ॥ ८७ ॥ ॥

श्राद्ध कर ह्मणजे हीं मुक्त होतील ॥ ८६ ॥ अशा प्रकारचें त्या वैश्याशीं त्या प्रेतराजाचें भाषण झाल्यानंतर सुवर्णासमान कांतीनेंयुक्त होत्साता दिव्य विमानांत बसून तो स्वर्गलोकास गेला ॥ ८७ ॥

अशा प्रकारें आतिथ्याच्या प्रभावानें तो पिशाचराज स्वर्गास गेल्यावर तो वैश्य त्या सर्व पिशाचांचीं नामें व गोत्रें घेऊन हिमालयपर्वतावर गेला ॥ ८८ ॥ तेथें त्या पिशाचराजानें सांगितल्याप्रमाणें त्यास द्रव्याचा निधि प्राप्त झाला. नंतर तो वैश्य द्रव्याचा निधि घेऊन आपल्या घरीं गेला. पुढें पुष्कळ द्रव्य घेऊन तो गयेंतील वटवृक्षापाशीं गेला ॥ ८९ ॥ तेथें

स्वर्गतेप्रेतनाथेवैप्रभावात्सवणिक्क्रमात् ॥ नामगोत्राणिसंगृह्यप्रयातःसहि
मालयम् ॥ ८८ ॥ तत्रप्राप्यनिधिंगत्वाविनिक्षिप्यस्वकेगृहे ॥ धनभारमु
पादायगयाशीर्षवटंययौ ॥८९॥ प्रेतानांक्रमशस्तत्रचक्रेश्राद्धंदिनेदिने ॥
यस्ययस्ययथाश्राद्धंसकरोतिदिनेवणिक् ॥ ९० ॥ सोपितस्यतदास्वप्नेदर्श
यत्यात्मनस्तनुम् ॥ ब्रवीतिचमहाभागप्रसादेनतवानघ ॥ ९१ ॥ ॥

त्यानें प्रतिदिवशीं एका पिशाचाचें श्राद्ध अशा रीतीनें सर्व पिशाचांचीं क्रमाक्रमानें श्राद्धें केलीं. ज्या ज्या प्रेताचें तो वैश्य ज्या ज्या दिवशीं श्राद्ध करी ॥ ९० ॥ त्या दिवशीं रात्रीं तें पिशाच त्या वैश्यास स्वप्नांत आपलें शरीर दाखवीत असे; आणि ह्मणे कीं, हे महाभाग्यवंता निष्पापा, तुझ्या प्रसादानें ॥ ९१ ॥

या प्रेतदेहाचा त्याग करून मी उत्तम गतीला पावलों. नंतर तीं सर्व पिशाचें विमानांत बसून त्या वैश्यास ह्मणालीं ॥ ९२ ॥ हे वैश्यवर्या, त्वां आह्मां सर्वांस या प्रेतयोनिकारक पापांतून तारिलेंस. आतां आह्मीं सर्वही तुझ्या प्रसादानें स्वर्गास जातों ॥ ९३ ॥ साधुसंग

प्रेतभावमिमंत्यक्त्वाप्राप्तोस्मिपरमांगतिम् ॥ ततस्तुतेविमानस्थाऊचुश्चव
णिजंतथा ॥९२॥ त्वयाहितारिताःसर्वेकिल्बिषाद्वणिजोत्तम ॥ प्रयामःस्वर्ग
तिंसर्वेइदानींत्वत्प्रसादतः ॥९३॥ साधुसंगोनहिवृथाकदाचिदपिजायते ॥
एवमुक्त्वागताःसर्वेविमानैःसूर्यसन्निभैः ॥९४॥ दिव्यरूपधराःसर्वेद्योतयं
तोदिशोदश ॥ हरिदत्तश्चतान्सर्वान्समुद्धृत्यजगामह ॥ ९५॥ स्वदेशस्थं
चनगरंस्वगृहंचविवेशह ॥ सकृत्वाधनलोभेनप्रेतानांसद्गतिंवणिक् ॥९६॥

कदापि व्यर्थ होत नाहीं. असें बोलून तीं सर्व पिशाचें दिव्य रूपें धारण केलेलीं दशदिशा प्रकाशित करीत सूर्यासारख्या तेजःपुंज विमानांत बसून स्वर्गास गेलीं. नंतर तो हरिदत्त वैश्यही आपल्या देशीं आपल्या घरीं गेला. ॥ ९४ ॥ ९५ ॥ ९६ ॥

अशा रीतीनें तो वैश्य धनलोभेंकरून त्या पिशाचांस उत्तम गतीला लावून आपल्या घरीं गेल्यावर हे युधिष्ठिरा, भाद्रपदमासीं श्रवणयुक्त द्वादशी आली असतां तो वामनाची पूजा करून ॥ ९७ ॥ ब्राह्मणास दान देऊन आणि स्वतः जितेंद्रिय राहून उपवास करीत असे. तसेंच महानद्यांच्या संगमीं जाऊन स्नान करून प्रतिवर्षी निरालस्यपणें

जगामस्वगृहंतत्रमासिभाद्रेयुधिष्ठिर ॥ श्रवणद्वादशीयोगेपूजयित्वाजना र्दनम् ॥ ९७ ॥ दानंदत्वाचविप्रेभ्यःसोपवासोजितेंद्रियः ॥ संगमेचमहा नद्योःप्रतिवर्षमतंद्रितः ॥ ९८ ॥ चकारविधिवद्दानंततोदिष्टांतमागतः॥ अवापपरमंस्थानंदुर्लभंसर्वमानवैः ॥ ९९ ॥ यत्रकामफलावृक्षानद्यःपाय सकर्दमाः ॥ शीतलामलपानीयाःपुष्करिण्योमनोरमाः ॥ १०० ॥ ॥

॥९८॥ वामनद्वादशीव्रत व तत्संबंधी दानही विधियुक्त करीत असे. अशा रीतीनें आचरण करीत असतां देहप्रारब्ध संपल्यावर तो मरण पावला, आणि सर्व मानवांस दुर्लभ अशा उत्तम स्थानाप्रत पावला ॥ ९९ ॥ तें स्थान असें आहे कीं, तेथील वृक्ष इच्छित फळें

देणारे आहेत. तेथील नद्यांत खिरीचा चिखल असतो. तेथें शीतल आणि निर्मळ उदकानें भरलेल्या अशा सुंदर पुष्करिणी आहेत ॥ १०० ॥ अशा त्या लोकास जाऊन महात्मा आणि अति तप्त सुवर्णासारख्या अंगानें शोभणारा असा तो वैश्य स्वर्गलोकांत एक समग्र कल्पपर्यंत देवांगनांसहवर्तमान हर्षयुक्त होत्साता निरंतर उत्तम प्रकारें रममाण झाला

तद्देशमासाद्यवणिङ्महात्माप्रतप्तजांबूनदभूषितांगः ॥ कल्पंसमग्रंसुरसुंदरीभिःस्वर्गेसुरेमेमुदितःसदैव ॥ १०१ ॥ बुधश्रवणसंयुक्ताद्वादशीसर्वकामदा ॥ दानंदध्योदनंशस्तमुपवासःपरोविधिः ॥ १०२ ॥ सगरेणककुत्स्थेनधुंधुमारेणगाधिना ॥ एतैश्चान्यैश्चराजेंद्रकामदाद्वादशीकृता ॥१०३॥

॥ १०१ ॥ भाद्रपद शुद्ध द्वादशी बुधवार व श्रवणनक्षत्र यांनीं युक्त असेल तर ती सर्व मनोरथ पूर्ण करणारी आहे. या द्वादशीला दध्योदनदान प्रशस्त असून उपोषण करणें उत्कृष्ट विधि आहे ॥ १०२ ॥ हे राजश्रेष्ठा, सगर, ककुत्स्थ, धुंधुमार, गाधि आणि अन्य राजांनीं ही सर्व मनोरथ पूर्ण करणारी द्वादशी केली ॥ १०३ ॥

भाद्रपदांत शुक्लपक्षीं जी द्वादशी श्रवणासहवर्तमान बुधवारानेंयुक्त असते तिला ऋषींनीं जया असें ह्मटलें आहे. त्या द्वादशीचे दिवशीं उपोषण केल्यानें मनुष्य अणिमादि गुणयुक्त उत्कृष्ट सिद्धि पावतो ॥ १०४ ॥ याच द्वादशीला वामनजयंती व्रत असतें. श्री-

याद्वादशीबुधयुताश्रवणेनसार्धंसावैजयेतिकथितामुनिभिर्नभस्ये॥तामा
दरेणसमुपोष्यनरोहिसम्यक्प्राप्नोतिसिद्धिमणिमादिगुणोपपन्नाम्॥१०४॥*
अस्यामेववामनजयंतीव्रतम् ॥ ॥ श्रीकृष्ण उवाच ॥ ॥ द्वादश्या
स्तेविधिःप्रोक्तःश्रवणेनयुधिष्ठिर ॥ सर्वपापप्रशमनःसर्वसौख्यप्रदायकः
॥ १०५ ॥ एकादशीयदासास्याच्छ्रवणेनसमन्विता ॥ विजयासातिथिः
प्रोक्ताव्रतिनामभयप्रदा ॥ १०६ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

कृष्ण ह्मणतात हे युधिष्ठिरा. श्रवणयुक्त द्वादशीचा विधि तुला सांगितला. तो सर्व पापांचा नाश करणारा असून सर्व प्रकारचीं सुखें देणारा आहे ॥ १०५ ॥ भाद्रपदशुक्ल एकादशी जेव्हां श्रवण नक्षत्रानेंयुक्त असते तेव्हां तिला विजया असें ह्मणतात, आणि ती व्रत कर-

* इति भविष्योत्तरपुराणे श्रवणद्वादशीकथा ॥

णारांस अभय देणारी आहे ॥ १०६ ॥ हे युधिष्ठिरा, पूर्वीं इंद्र, अग्नि आणि वायु यांसहित सर्व देवगणांनीं वरदात्या विष्णूची प्रार्थना केली ॥ १०७ ॥ कीं, हे भगवन्, बलिनामक महासैन्ययुक्त, बलवान् आणि अजिंक्य असा एक दैत्य आहे. त्यानें सर्व देव आ-

पुरादेवगणैःसर्वैःसमेत्यचयुधिष्ठिर ॥ वरदःप्रार्थितोविष्णुरिंद्राग्न्यनिलसंयु
तैः ॥ १०७ ॥ बलवानजितोदैत्योबलिर्नाममहाबलः ॥ तेनदेवगणाःसर्वे
पातितानिजमंदिरात् ॥ १०८ ॥ त्वंगतिःसर्वदेवानांशीघ्रंकष्टात्समुद्धर ॥
दैत्यंजहिमहाबाहोबलिंबलवतांवर ॥ १०९ ॥ श्रुत्वाविष्णुस्तदावाक्यंदे
वानांकरुणोदयम् ॥ उवाचवाक्यंवाक्यज्ञोदेवानांहितकाम्यया ॥ ११० ॥

पल्या मंदिरांत कोंडून ठेविले आहेत ॥ १०८ ॥ तुम्ही सर्व देवांस गति आहां, याकरितां आम्हांला दुःखांतून मुक्त करावें. हे बलिश्रेष्ठा महाबाहो, बलिदैत्याचा वध करा ॥ १०९ ॥ त्याकालीं देवांचें असें करुणाजनक वाक्य श्रवण करून वाक्यज्ञाता विष्णु देवांच्या हितेच्छेनें हें वचन बोलता झाला ॥ ११० ॥

तो बोलला, अहो देव हो, त्रैलोक्य ज्यापासून भयशंकित होत आहे असा विरोचनपुत्र जो बली त्याला मी जाणतों. तो तपानें शुद्धांतःकरण, शांत, दांत, जितेंद्रिय ॥ १११ ॥ माझा भक्त. माझे ठिकाणीं प्राण ठेवणारा, सत्यप्रतिज्ञ, महाबलिष्ठ, ब्रह्मदेवासारखा आपल्या प्रजांचे

विष्णुरुवाच ॥ ॥ जातंवैरोचनेःपुत्रंबलिंत्रैलोक्यशंकितम् ॥ तपसा भावितात्मानंशांतंदांतंजितेंद्रियम् ॥१११॥ मद्भक्तंमद्गतप्राणंसत्यसंधंमहा बलम् ॥ प्रजापतिसमंस्वात्मप्रजानांप्रियकारणम् ॥ ११२ ॥ नगुणास्तस्य शक्यंतेवक्तुंकेनापिभूतले ॥ अवश्यंतपसोपेतैर्भोक्तव्यंतपसःफलम् ॥११३॥ तपसोंतस्तुबहुनाकालेनास्यभविष्यति ॥ यदाचविजयंदैत्यंज्ञास्येकाले नकेनचित् ॥ ११४ ॥ ॥ ॥

प्रिय करणारा ॥ ११२ ॥ पृथ्वींत कोणीही त्याचे गुण वर्णूं शकणार नाहीं. तपश्चर्यासंपन्न लोकांनीं आपल्या तपाचें फल भोगलेंच पाहिजे ॥ ११३ ॥ बलींच्या तपाचा क्षय बहुत कालानें होणार आहे. कांहीं कालानें जेव्हां दैत्यांचा जयकाल गेला असें मी समजेन ॥११४॥

तेव्हां त्याची त्रैलोक्यलक्ष्मी हरण करून देवांला देईन. पुत्रेच्छा करणारी अदिती मला पुत्रार्थ शरण आली आहे ॥ ११५ ॥ तिचा मनोरथ आणि देवांचें कार्य यांविषयीं विष्णु विचार करूं लागला. मग अदितीच्या उदरीं गर्भांत जाण्याविषयीं बहुकाल विचारपूर्वक निश्चय करून ॥ ११६ ॥ त्यानें अदितीला सांगितलें कीं, तुझें इच्छित पूर्ण होईल. नंतर

समाहृत्यश्रियंतस्यतदादास्येदिवौकसाम् ॥ अदितिर्मांप्रपन्नावैपुत्रार्थेपुत्रगृद्धिनी ॥ ११५ ॥ तस्यामनीषितंदेवकार्यंविष्णुरचिंतयत् ॥ सचिंतयित्वासुचिरंदेव्यांगर्भावधारणम् ॥ ११६ ॥ अदितिंवरयामासवांछितंतेभविष्यति ॥ अथकालेबहुतिथेगतेसागुर्विणीबभौ ॥ ११७ ॥ सुषुवेनवमेमासिपुत्रंसावामनंहरिम् ॥ ह्रस्वपादंह्रस्वकायंमहाशिरसमर्भकम् ॥ ११८ ॥

बहुत काल गेला असतां अदिती गर्भिणी होऊन शोभूं लागली. ॥ ११७ ॥ पुढें नवव्या महिन्यांत त्या भक्तदुःख हरण करणाऱ्या वामनरूप पुत्राला प्रसवली. त्या मुलाचे पाय आंखूड होते, देह लहान होता आणि मस्तक फार मोठें होतें ॥ ११८ ॥

त्याचे हात, पाय व पोट हे अवयव अति कृश असून पोटऱ्या, मांड्या व केश हींही त्याचीं लहानच होतीं. अशा रीतीचा वामन (खुजा) पुत्र झालेला अवलोकन करून अदितीला मोठा आनंद झाला ॥ ११९ ॥ दैत्यांला भय प्राप्त झालें, व देवांला हर्ष झाला. त्याकालीं स्वतःच शुभकारक जातकर्मादिक संस्कार ॥ १२० ॥ ब्रह्मदेवासहवर्तमान बुद्धिमान् अशा कश्य-

पाणिपादोदरकृशंह्रस्वजंघोरुकेसरम् ॥ दृष्ट्वातुवामनंजातमदितिर्मोदमापवै ॥ ११९ ॥ भयंबभूवदैत्यानांदेवानांतोषआगमत् ॥ जातकादीन्शुभकरान्संस्कारान्स्वयमेवहि ॥ १२० ॥ चकारकश्यपोधीमान्प्रजापतिसमन्वितः ॥ आबद्धमेखलोदंडीजटीयज्ञोपवीतवान् ॥ १२१ ॥ कुशचर्माजिनधरःकमंडलुविभूषितः ॥ बलेर्बलवतोयज्ञंजगामबहुविस्तरम् ॥१२२॥

पानें स्वतःच केले. पुढें ज्याच्या कटीला मेखला (मुंज) बांधली असून दंड, जटा यज्ञोपवीत हीं ज्यानें धारण केलीं आहेत ॥ १२१ ॥ आणि दर्भ कृष्णाजिन ज्यानें धारण केलें असून ज्याचे हस्तांत कमंडलु शोभत आहे असा तो वामनरूप भगवान बहु विस्तृत अशा

बलाढ्य बलीच्या यज्ञांत गेला ॥ १२२॥ आणि त्या दैत्याचें सर्व बल पाहून त्यास बोलतो, हे यज्ञपते, मी याचक प्राप्त झालों आहें. मला भूमी दे ॥१२३॥ ह्मणजे त्यास्थलीं अध्ययनार्थ पादत्रयपरिमित माझा मठ होईल. तेव्हां बलि त्या ब्राह्मणाला बोलला कीं, तुला तशी भूमी दिली ॥ १२४ ॥ असें भूमिदान झाल्यानंतर तो अनंत पराक्रमी वामन वाढूं

दृष्ट्वादैत्यबलंसर्ववामनस्तुजगादह ॥ अर्थीह्यहंयज्ञपतेदीयतांममेदिनी ॥१२३॥ पदत्रयप्रमाणोहिपठनार्थैमठोमम ॥ दत्तादत्तातवतथाबलिःप्राहद्विजोत्तमम् ॥ १२४ ॥ ततोवर्धितुमारब्धोवामनोनंतविक्रमः ॥ पादौभूमौप्रतिष्ठाप्यशिरसावृत्यरोदसी ॥ १२५ ॥ ताभ्यांस्वर्गादिकांल्लोकांल्ललाटेब्रह्मणःपदम् ॥ नतृतीयंपदंलेभेकिंददेर्ममतद्वद ॥ १२६ ॥ ॥

लागला. तो असा कीं, पायानें सर्व भूमी व्यापून मस्तकानें अंतरिक्ष व स्वर्गलोक व्याप्त केले ॥ १२५ ॥ अशा त्या दोन्हीं चरणांनीं स्वर्गादि लोक व्यापून ललाटस्थानीं ब्रह्मदेवाचा लोक आला. तृतीय चरणाला स्थलच राहिलें नाहीं ह्मणून वामन बळीला ह्मणाला, बले तृतीय पदाला स्थान कोणतें देणार तें मला सांग ॥ १२६ ॥

असें वामन बोलल्यावर बळी ह्मणाला तुझा चरण माझ्या मस्तकावर ठेव. असें तें महत् आश्चर्य पाहून सिद्ध आणि नारदादिक देवर्षि ॥१२७॥ बहुत उत्तम, हें फार चांगलें असें ह्मणून हर्षयुक्त होऊन वामनाची स्तुति करूं लागले. नंतर सर्व दैत्यगणांला जिंकून त्रिभुवन स्वाधीन करून स्वतंत्र भगवान् ॥ १२८ ॥ बलीला बोलले, हे दैत्यराज, तूं सैन्य व

एवमुक्तोबलिःप्राहमूर्ध्निमेदेहितेपदम् ॥ तद्दृष्ट्वामहदाश्चर्यंसिद्धादेवर्षयस्तथा ॥ १२७ ॥ साधुसाध्वितिदेवेशंप्रशशंसुर्मुदान्विताः ॥ ततोदैत्यगणान्सर्वान्जित्वात्रिभुवनंवशी ॥ १२८ ॥ बलिंप्राहचभोगच्छपातालंसबलानुगः ॥ तत्रत्वमीप्सितान्भोगान्भुक्त्वामद्बाहुपालितः ॥१२९॥ अस्यैंद्रस्यावसानेतुत्वमेवेंद्रोभविष्यसि ॥ एवमुक्तोबलिःप्रायान्नमस्कृत्यसुरोत्तमम् १३०

सेवक यांसहवर्तमान पाताळीं गमन कर. तेथें माझे भुजांनीं सुरक्षित राहून इच्छित भोग भोगून ॥ १२९ ॥ या इंद्राच्या समाप्तिकालीं तूंच इंद्र होशील, अशाप्रकारें आज्ञा केलेला बलि देवश्रेष्ठ अशा वामनाला नमस्कार करून पाताळांत गेला ॥ १३० ॥

याप्रमाणें बळीला पाताळलोकीं पाठवून वामन लोकपाळांस ह्मणाले कीं, तुह्मीं आपापल्या स्थानीं जावें आणि तेथें नष्टदुःख होऊन स्वस्थ रहा ॥१३१॥ असें देवानें आज्ञापित देव हर्षयुक्त होत्साते वामनाची पूजा करून आपापल्या पदीं गेले. आणि देव वामन जगाचें

विसृज्यचबलिंदेवोलोकपालानुवाचह ॥ स्वानिधिष्ण्यानिगच्छध्वंतिष्ठध्वं विगतज्वराः ॥ १३१ ॥ देवेनोक्तागतादेवाःप्रहृष्टाःपूज्यवामनम् ॥ देवःकृत्वाजगत्कार्यंतत्रैवांतरधीयत ॥१३२॥ एतत्सर्वंसमभवदेकादश्यांनराधिप ॥ तेनेष्टादेवदेवस्यसर्वदाविजयातिथिः ॥ १३३ ॥ मासिभाद्रपदेशुक्लेद्वादशीश्रवणान्विता ॥ विजयाप्रोच्यतेसद्भिःकोटिकोटिगुणोत्तरा ॥१३४॥

कार्य करून तेथेंच गुप्त झाले ॥ १३२ ॥ हे राजा, एकादशीला हें कृत्य झालें ह्मणून देवाधिदेव वामनाला ती विजयानामक तिथि सर्वदा प्रिय झाली ॥१३३॥ भाद्रपदमासीं शुक्लपक्षांतील श्रवणनक्षत्रयुक्त जी द्वादशी ती विजया असें साधूंनीं ह्मटलें आहे. ती अन्य तिथींपेक्षां कोटि कोटि गुण अधिक आहे ॥ १३४ ॥

अशा एकादशीला उपवास करून रात्रौ हरीची उत्तम पूजा करावी. तिचा प्रकार असा- सुवर्ण, रुपें, वेळु किंवा काष्ठ यांतील यथाशक्ति कोणत्याही पात्रांत ॥ १३५ ॥ व्रत कर्त्यानें आपल्या सामर्थ्यानुसार सुवर्णाची वामनाची प्रतिमा करावी. ती अशी—शिखा, कमंडलु, छत्र आणि यज्ञोपवीत धारण करणारा ॥ १३६ ॥ अशा लक्षणांनीं युक्त वामनरूप हरीस

एकादश्यांसोपवासोरात्रौसंपूजयेद्धरिम् ॥ रौप्येसुवर्णपात्रेवादारुवंशमये
पिवा ॥ १३५ ॥ सौवर्णवामनंकुर्यात्स्ववित्तस्यानुसारतः ॥ शिखाकमंड
लुधरंछत्रयज्ञोपवीतिनम् ॥ १३६ ॥ एवंलक्षणसंपन्नंवामनंपूजयेद्धरिम् ॥
आच्छाद्यपात्रंवासोभिरहतैःफलसंयुतैः ॥ १३७ ॥ मार्गेणचर्मणाकुर्याद्भ
क्त्यावाशक्त्यपेक्षया ॥ तिलाढकेनसंपूर्णंप्रस्थेनकुडवेनच ॥ १३८ ॥ ॥

पूजावें. तें वामनाची स्थापना केलेलें पात्र फलयुक्त कोऱ्या वस्त्रांनीं आच्छादित करावें ॥१३७॥ अथवा भक्तीनें कृष्णाजिनेंकरून तें पात्र आच्छादित करावें, आणि आढक, कुडव किंवा प्रस्थ यांतून आपल्या शक्त्यनुसार तिळांनीं तें पात्र भरावें ॥ १३८ ॥

तीळ न मिळतील तर सातू, गहूं, फळें किंवा पांढरे तीळ यांनीं तें पात्र पूर्ण भरावें, आणि त्यांतील कृष्णाजिनावर अतसीपुष्पासमान नीलवर्ण अशा वामनाची स्थापना करून ॥१३९॥ यथाकालोद्भव फुलें, फळें, गंध आणि धूप यांनीं हरीचें पूजन करावें. अनेक प्रकारचे भक्ष्य भोज्य पदार्थ व गुळमिश्रित भात हे नैवेद्यास असावे ॥ १४० ॥ तशीच आपल्या

अलाभेयवगोधूमैःफलैःशुक्लतिलैर्भवेत् ॥ अतसीपुष्पसंकाशंतिलकृष्णाजिनोपरि ॥ १३९ ॥ पुष्पैर्गंधैःफलैर्धूपैःकालोत्थैरर्चयेद्धरिम् ॥ नानाविधैश्चनैवेद्यैर्भक्ष्यभोज्यैर्गुडौदनैः ॥१४०॥ स्वस्यवित्तानुसारेणसहिरण्यंचकारयेत् ॥ एभिर्मंत्रपदैस्तत्रपूजयेद्गरुडध्वजम् ॥ १४१ ॥ उपहारैर्नरश्रेष्ठशुचिर्भूत्वासमाहितः ॥ कृत्वाबालमयंदेहंदेवदेवस्यचक्रिणः ॥ १४२ ॥

सामर्थ्यानुरूप सुवर्णदक्षिणा द्यावी. तसेंच पूर्वीं सांगितलेल्या मत्स्य कूर्मादिमंत्रपदांनीं अंगपूजापूर्वक गरुडध्वजाची पूजा करावी ॥ १४१ ॥ हे राजा, व्रत करणाऱ्यानें शुचिर्भूत होऊन एकाग्रचित्तानें उपहारांनीं हरीचें पूजन करावें. वामनाची प्रतिमा बालरूपधारी अशी करावी ॥ १४२ ॥

नंतर आवाहन करावें. तें असें—आकाशादि महाभूतांनीं युक्त ब्रह्मांड ज्याच्या उदरांत आहे असा जगत्पालक, मायावी, लक्ष्मीकांत वामन ही पूजा ग्रहण करण्याकरितां येवो ॥१४३॥ नंतर युधिष्ठिर प्रश्न करितो—हे वक्त्यांमध्यें श्रेष्ठ पुरुषोत्तमा, उपोषण करण्याविषयीं जे अशक्त आहेत त्यांस जी एक पुण्यकारक द्वादशी असेल ती मला कथन करा ॥ १४४ ॥

ब्रह्मांडमुदरेयस्यमहद्भूतैरधिष्ठितम् ॥ मायावीवामनःश्रीशःसमायातुजगत्पतिः ॥ १४३ ॥ ॥ युधिष्ठिरउवाच ॥ ॥ उपवासासमर्थानांयाचेहंपुरुषोत्तम ॥ एकांचद्वादशींपुण्यांवदस्ववदतांवर ॥१४४॥ श्रीकृष्णउवाच ॥ मासिभाद्रपदेशुक्लेद्वादशीश्रवणान्विता ॥ सर्वकामप्रदापार्थउपोष्यानियमात्सदा ॥ १४५ ॥ सरितांसंगमेस्नात्वाद्वादशींसमुपोषयेत् ॥ स्नानंदानंजपोहोमःस्वाध्यायःपितृतर्पणम् ॥ तस्यांयत्क्रियतेपार्थतदनंतफलंलभेत् १४६

श्रीकृष्ण सांगतात—हे कुंतीनंदना, भाद्रपदमासीं शुक्लपक्षांत श्रवणयुक्त द्वादशी सर्व मनोरथ पूर्ण करणारी आहे, यास्तव नियमानें त्यादिवशीं उपोषण करावें ॥ १४५ ॥ नद्यांचे संगमीं स्नान करून उपोषण करावें. स्नान, दान, जप, होम, वेदाध्ययन आणि पितृतर्पण

इत्यादि जें जें कर्म या द्वादशीचेदिवशीं करावें त्याचें अनंत फल प्राप्त होतें ॥ १४६ ॥ युधिष्ठिर पुनः प्रश्न करितो–कृष्णा, तुमच्या कृपेनें मी वामनव्रत ऐकिलें. आतां या व्रताचें उद्यापन मला सांगा ॥ १४७ ॥ श्रीकृष्ण ह्मणतात–हे पंडुनंदना, या व्रताचें उद्यापन सांगतों ऐक. हे कुंतीसुता, उद्यापन केलें असतां व्रत निश्चयेंकरून सफल होतें. उद्यापन

युधिष्ठिरउवाच ॥ ॥ त्वत्प्रसादाच्छ्रुतंकृष्णमयातुवामनव्रतम् ॥ इदानीं ब्रूहिमेकृष्णव्रतोद्यापनमुत्तमम् ॥ १४७ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ ॥ शृणुपांडववक्ष्यामिव्रतोद्यापनमुत्तमम् ॥ कृत्वैवसफलंपार्थव्रतंभवतिनिश्चितम् ॥ आदौमध्येतथाचांतेव्रतस्योद्यापनंभवेत् ॥ १४८ ॥ उद्यापनंततःकुर्याद्द्वादशैर्वत्सरैस्तथा ॥ सौवर्णींराजतींताम्रींमूर्तिंकृत्वाचतुर्भुजाम् ॥ १४९ ॥

व्रताच्या आरंभीं, मध्यें व अंतीं करावें ॥ १४८ ॥ तें असें–पूर्वोक्त विधीनें बारा वर्षें व्रत करून नंतर उद्यापन करावें. सुवर्णाची, रुप्याची किंवा तांब्याची वामनाची चतुर्भुज मूर्ति करून ॥ १४९ ॥

द्वादशीच्या दिवशीं आपल्या शक्त्यनुसार गुरुपूजन करावें. हे धर्मा, तो गुरु सदाचारसंपन्न असून वेदवेदांग पारंगत असा असावा ॥१५०॥ त्याची प्रार्थना करावी कीं, हे द्विजोत्तमा, हरिदिनीं केलेलें माझें हें व्रत जेणेंकरून सांग संपूर्ण होईल असें आपण करावें ॥ १५१ ॥ नंतर त्याच्या अग्रभागीं उद्यापनसंबंधी नियम करावा. पश्चात् दंतधावन करून नदी आदि-

द्वादश्यास्तुदिनेप्राप्तेगुरुमभ्यर्च्यशक्तितः ॥ सदाचाररतंपार्थवेदवेदांगपा
रगम् ॥ १५० ॥ अस्मदीयंव्रतंविप्रविष्णुवासरसंभवम् ॥ संपूर्णंतुभवेद्ये
नतत्कुरुष्वद्विजोत्तम ॥ १५१ ॥ तस्याग्रेनियमःकार्योदंतधावनपूर्वकम् ॥
स्नानंकृत्वामंत्रपूर्वंनद्यादौविमलेजले ॥ १५२ ॥ तर्पयित्वापितृन्देवान्पूज
येन्मधुसूदनम् ॥ एवंसंपूज्यविधिवद्रात्रौजागरणंचरेत् ॥१५३॥ ततःप्रभात
समयेस्नात्वाचार्यादिभिःसह ॥ वामनंपूजयेत्प्राग्वद्धोमंकुर्याद्विधानतः १५४

कांच्या शुद्ध उदकांत समंत्रक स्नान करावें ॥ १५२ ॥ त्यानंतर देवपितरांचें तर्पण करून त्या स्थापित मधुसूदनाची पूजा करावी. याप्रमाणें विधियुक्त वामनाची पूजा करून रात्रीं जागरण करावें ॥ १५३ ॥ नंतर दुसरे दिवशीं प्रातःकाळीं आचार्यादिकांसह स्नान करून

पूर्वींप्रमाणें वामनाची पूजा करावी आणि विधिपूर्वक होम करावा ॥ १५४ ॥ " इदंविष्णु विंचक्रमे " या मंत्रानें समिधा, तूप, तीळ आणि चरु या प्रत्येक द्रव्याचा सहस्र किंवा अष्टोत्तरशतसंख्यापरिमित होम करावा ॥ १५५ ॥ हे राजा, व्रतकर्त्यानें बारा अथवा आठ ब्राह्मणांस भोजन घालावें, आणि प्रतिमा व गोप्रदान हीं आचार्याला द्यावीं ॥ १५६ ॥

मंत्रेणेदंविष्णुरितिसमिदाज्यतिलौदनैः ॥ प्रतिद्रव्यंसहस्रंवाशतमष्टोत्तरंहुनेत् ॥ १५५ ॥ ब्राह्मणान्भोजयित्वातुद्वादशाष्टव्रतीनृप ॥ प्रतिमांचतथाधेनुमाचार्यायनिवेदयेत् ॥ १५६ ॥ एवंकृतेतुराजेंद्रगाःकृष्णाद्वादशाष्टवा ॥ षट्चतस्रोथवादेयाएकावापिपयस्विनी ॥ १५७ ॥ वामनःप्रतिगृह्णातिवामनोवैददाति च ॥ वामनस्तारकोद्वाभ्यांवामनायनमोनमः ॥ १५८ ॥ ॥ ७ ॥

इतकें कृत्य झाल्यावर हे राजेंद्रा, बारा, आठ, सहा, चार किंवा निदान एकतरी गोप्रदान करावें. त्या सर्व गाई कृष्णवर्ण असाव्या. एकच गोप्रदान करावयाचें असल्यास ती गाय पुष्कळ दूध देणारी अशी असावी ॥१५७॥ दानमंत्र—वामन घेतो, वामन देतो आणि वामनच आपणां दोघांस तारक आहे यास्तव वामनास वारंवार नमस्कार असो ॥ १५८ ॥

अशा मंत्रानें प्रतिमेचें दान केल्यावर प्रातःकाळीं दधिमिश्रित तुपाचें ब्राह्मणास पूर्वी भोजन घालून नंतर व्रतकर्त्यांनें मौन धारण करून आपण भोजन करावें ॥ १५९ ॥ हे राजा, या व्रतांत प्रत्येक ब्राह्मणास उदकुंभ, दक्षिणा, वस्त्रें व चंदन हीं दानें वारंवार यथेच्छ द्यावीं. हा असा विधि सर्वत्र जाणावा ॥१६०॥ हे ब्राह्मणा, असें व्रत केलें असतां जें पुण्य प्राप्त होतें

एवंदत्वाततःप्रातर्भोजनंपृषदाज्यकम् ॥ पूर्वंदद्याद्ब्राह्मणेभ्यःपश्चाद्भुंजीतवाग्यतः ॥ १५९ ॥ प्रत्येकंब्राह्मणान्कुंभान्दक्षिणावस्त्रचंदनम् ॥ भूयोयथेच्छयाराजन्सर्वत्रैषविधिःस्मृतः ॥ १६० ॥ एवंव्रतेकृतेब्रह्मन्यत्पुण्यंतन्निबोधमे ॥ यावत्कल्पशतंपुण्यमेकसप्ततिसंख्यया ॥ १६१ ॥ प्राप्यविष्णुपुरंभोगान्भुंजतेकालमक्षयं ॥ इहागत्यभवेद्राजन्राजभिश्चसुसेवितः ॥ १६२ ॥ इतिश्रीभविष्योत्तरपुराणेवामनद्वादशीव्रतोद्यापनकथासंपूर्णा ॥ ॥ छ ॥

तें ऐक. एकशें एकाहत्तर कल्पपर्यंत याचें पुण्य प्राप्त होतें. ॥१६१॥ तेणेंकरून मनुष्य विष्णुपुरास प्राप्त होऊन अक्षय्य काल भोग भोगतो. हे राजन्, तो पुनः भूलोकीं येऊन सर्व राजांनीं उत्तमप्रकारें सेवित असा सार्वभौम राजा होतो ॥ १६२ ॥ इति श्रीभविष्योत्तरपुराणे वामनद्वादशीव्रतसार्थकथा समाप्ता ॥ शुभंभवतु ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

पूजेचें साहित्य.

हळद, कुंकूं, अबीर, गुलाल, कापूर, उदबत्ती, फुलें, तुळशी, दूर्वा, आंब्याचा टाळा, फुलवाती,
पंचामृतसाहित्य. दूध, दहीं, तूप, मध, साखर, नारळ २, तांदूळ शेर १,
विड्याचीं पानें १६, सुपाऱ्या १०, कलश १, पूर्णपात्र १, वस्त्रें २,
प्रतिमा १, शिंकें १, उदकुंभ १, दहींभात, चर्मी जोडा १,
छत्री १, कौपीन २, कृष्णाजिन, दंडकाष्ठ
पळसाचें १, मखरास केळी ४.

हें पुस्तक वे. शा. वासुदेव लक्ष्मणशास्त्री पणशीकर यांनीं तयार केलें, तें
"निर्णयसागर" छापखान्याचे मालक तुकाराम जावजी
यांनीं छापून प्रसिद्ध केलें.
शके १८२९, सन १९०७.

इति वामनद्वादशीपूजा सार्थकथा च॥

[OrderDescription]
,CREATED=12.06.20 13:53
,TRANSFERRED=2020/06/12 at 14:00:27
,PAGES=55
,TYPE=STD
,NAME=S0003129
,Book Name=M-966-VAMAN DWARDASHI PUJA
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF

FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF

FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
,FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF
,FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF
,FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF
,FILE38=00000038.TIF
,FILE39=00000039.TIF
,FILE40=00000040.TIF
,FILE41=00000041.TIF
,FILE42=00000042.TIF

FILE43=00000043.TIF
,FILE44=00000044.TIF
,FILE45=00000045.TIF
,FILE46=00000046.TIF
,FILE47=00000047.TIF
,FILE48=00000048.TIF
,FILE49=00000049.TIF
,FILE50=00000050.TIF
,FILE51=00000051.TIF
,FILE52=00000052.TIF
,FILE53=00000053.TIF
,FILE54=00000054.TIF
,FILE55=00000055.TIF
,